## प्रेस नोट

दिनांक:- २५.०२.२०१७

सिव्हील लाईन पोलीस स्टेशन येथे फिर्यादी अमोल ज्ञानेश्वर आंबुसकर रा. लक्ष्मी नगर डाबकी रोड अकोला यांची मोटार सायकल डॉ. पटोकार हॉस्पीटल अकोला येथून कोणीतरी अज्ञात इसमांनी चोरुन नेल्याची तक्रार दिल्यावरुन अप नं. ४९/२०१७ कलम ३७९ भादंवि प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. मा. जिल्हा पोलीस अधीक्षक श्री. चंद्रकिशोर मीणा , शहर उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. उमेश माने पाटील व स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. कैलास नागरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोहेकॉ. प्रमोद डोईफोडे, नापोशि शंकर डाबेराव, राजेश्वर सोनोने , पोशि संतोष गावंडे, यांनी संशयीतांची कसून चौकशी केली त्यात आरोपी नामे चेतन सुरेश मोता वय ४० वर्षे रा. निलेश वेल्डींग वर्क्स लकडगंज खामगांव जि. बुलडाणा यास ताब्यात घेवून विचारपूस केली असता त्याने सदर मोटार सायकल चोरी केल्याची कबुली दिल्याने आज दिनांक. २५.०२.२०१७ रोजी त्याचेपासून होंन्डा शाईन मोटारसायकल MH-30 AE- 5994 जप्त करण्यात आली असून जप्त मालाची किंमत ६३,०००/- रूपये आहे.

( के. एच. शेळके )
सहा. पोलीस निरीक्षक तथा
जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधीक्षक कार्यालय, अकोला
मो.नं. ९४२२९५८६१५

प्रति,

संपादक , दैनिक --------

कृपया आपल्या दैनिक वृत्तपत्रापमध्ये प्रसिध्दी देण्यास विनंती आहे.